राज्य निवडणूक आयोगाच्या आदर्श
आचारसंहिता पुस्तिकेतील दुरुस्तीबाबत.

निवडणूक तात्काळ

सत्यमेव जयते

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
क्रमांक- रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.३/का.५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक - १४/२/२०१२

## परिपत्रक

राज्य निवडणूक आयोगाने वितरित केलेल्या आचारसंहितेबाबतच्या पुस्तिकेमध्ये असलेल्या प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ८१ मध्ये मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राजवळ उमेदवाराच्या तात्पुरत्या कार्यस्थानाच्या ठिकाणी ३ फूट x ४.५ फूट आकाराचे बॅनर लावता येईल. ज्यावर उमेदवाराचे नाव, पक्षाचे नाव मिळालेले निवडणूक चिन्ह या व्यतिरिक्त अन्य मजकूर नसावा असे नमूद केले आहे. सदर सूचना राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्र.स्थास्वसं/२०११/प्र.क्र.२५/का.५, दि.२९/१२/२०११ च्या मुद्दा क्र. २४ (ड) ५ शी विसंगत असून प्रश्नावलीतील उपरोक्त सूचना रद्द समजण्यात याव्यात.

**तरी आचारसंहितेचे आदेश क्र.स्थास्वसं/२०११/प्र.क्र.२५/का.५, दि.२९/१२/२०११ मधील मुद्दा क्र. २४ (ड) ५ अनुसार मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राजवळ उमेदवाराच्या तात्पुरत्या कार्यस्थळाच्या दर्शनी भागावर कोणतेही भित्तीपत्रक, ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य लावता येणार नाही.**

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

(स्वाक्षरी)

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त.
सर्व निवडणूक निर्णय अधिकारी.